**नियमित दिवाणी दावा क्र. १३१/२०१९**
**निशाणी क्र. ६० सोबत**

**<u>प्रतिवादींतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील उलटतपास वादीतर्फे वकील श्री. ए. जी. पठाण यांचेमार्फत शपथेवर सुरुः</u>**

८. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मी गट क्रमांक ७५५ संदर्भात मोजणीसाठी न्यायालयात दावा दाखल केला आहे. गट क्रमांक ७५५ मध्ये माझे ३२ आर खरेदी क्षेत्र आहे व त्यामध्ये ५ आर क्षेत्र पोट खराबा आहे. सदरील क्षेत्र मी संतोष गोपीनाथ लगड यांचेकडुन सन १९८२ मध्ये खरेदी घेतलेले आहे. एकत्रीकरणापुर्वी गट क्रमांक ७५५ चा काय सर्वे क्रमांक होता हे मला सांगता येणार नाही. मला ७५६ चा जुना सर्वे क्रमांक सांगता येणार नाही. गट क्रमांक ७५५ व ७५६ संदर्भात आमच्या नाशिक व अहमदनगर येथे केसेस चालु होत्या. त्या केसच्या कामकाजासाठी मी स्वत: जात असल्यामुळे मला त्याची माहिती आहे. त्या केसमध्ये गट क्रमांक ७५५ चा जुना सर्वे क्रमांक नमुद केलेला आहे. गट क्रमांक ७५६ चा जुना सर्वे क्रमांक त्या केसेसमध्ये नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, भुमि अभिलेख नाशिक यांच्या आदेशान्वये गट क्रमांक ७५५ व ७५६ च्या नकाशामध्ये दुरुस्ती झालेली आहे. मी नाशिक भुमि अभिलेख, नाशिक यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द मुंबई येथे अपील केलेले आहे. त्या अपीलामध्ये मी दोन्ही गटांची मोजणी होवुन मिळावी अशी मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, भुमि अभिलेख, नाशिक यांनी गट क्रमांक ७५५ व ७५६ च्या नकाशामध्ये केलेल्या दुरुस्ती आदेशाविरुध्द मी मंत्रालय, मुंबई येथे अपील दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७५६ चा जुना सर्वे क्रमांक ३१२/३ असा होता. मी जुना सर्वे क्रमांक ३१२ या संपुर्ण सर्वे क्रमांकाचा नकाशा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्रमांक ३१२ च्या नकाशामध्ये पोट हिस्से क्रमांक १ ते १३ दाखविलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७५५ शी वादीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७५६ शी माझा कोणताही संबंध नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत पुर्वी वादीचे वडिल लहानु रामा शिंदे यांच्या मालकी वहिवाटीची होती. मी गट क्रमांक ७५६ चा सातबारा उतारा पाहिलेला नाही. गट क्रमांक ७५६ मधील दावा मिळकत ही वादीचे वडिल यांनी सन १९८५ मध्ये वादी व वादीचा भाऊ यांचे नावे कौटुंबिक वाटपाप्रमाणे फेरफार क्रमांक

९९५ प्रमाणे करुन दिली हे मला सांगता येणार नाही. सन १९९६ मध्ये दावा मिळकतीपैकी वादीने त्याच्या भावाचे निम्मे क्षेत्र खरेदी घेतले हे मला सांगता येणार नाही. एकत्रीकरणाच्या वेळी गट क्रमांक ७५५ व ७५६ मधील मिळकती दरम्यान नकाशामध्ये रेष दर्शविण्याचे राहुन गेले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, उप संचालक भुमि अभिलेख, नाशिक यांच्या आदेशान्वये गट क्रमांक ७५५ व ७५६ मधील मिळकतीचे दरम्यान हद्द दर्शविणारी रेष नमुद करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७५५ व ७५६ मधील मिळकतीचे दरम्यान हद्द दर्शविणारी रेष नसल्याचे मला समजल्यानंतर मी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला दावा मिळकतीमध्ये नांगरट करताना हरकत अडथळा केला. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत वादीने दिनांक ०२/०३/२०१९ रोजी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादीचीच कब्जे वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्याला खोटी कैफियत देवुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – ०८-१२-२०२५

समक्ष श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,
ROAC

PATIL PRAVIN VISHWAS Sd/-
Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.12.08 11:18:53 +0530

**(श्री. पी. व्ही. पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
श्रीगोंदा